# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of History

## Assignment

## Session: 2020 – 2021

# Assignment - 2020-2021

Page No.:
Date: / /

Sudject -: History

Name -: Surbhi Mohan Shende.

B. A. (III - Sem)

College -: Yashoda Girls. Arts Commerce College. Nagpur.

HOD -: Dr. Suryakant Kapsikar.

SEAL

Student Singniture -: Smshende

* विषय :- भारतातील सामाजिक सुधारणा चळवळी

* प्रस्तावना :-

महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या धर्मविषयक संकल्पनांमध्ये व्यापक परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाने केले तत्कालीन शतकातील जुन्या धार्मिक आणि समाजिक चौकटित कालानुरूप नवा आशय भरण्याचे ~~कार्य~~ प्रामुख्याने महाराष्ट्रात प्रार्थना समाजाबरोबर सत्यशोधक समाजाने केले. समाजातिल अनिष्ठ, रुढी, प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा, कर्मकांड, अज्ञात, स्त्रीजिवन निरक्षर दलित व शेतकऱ्यांची हालअपेष्ठ या विशिष्ठ परिस्थितीमध्ये सत्यशोधक समाजाच्या उद्याची कारणे सापडतात. त्या परिस्थितीचे सत्य शोधण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. सामाजिक परिवर्तन हा या समाजाचा मुळ आत्मा आहे.

SEAL

दि. २४ सप्टेंबर १८७३ रोजी ज्योतिरावांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सर्व स्त्री व शुद्रांना मुक्त करणे आणि ब्राम्हणी शोषणापासून त्यांचा बचाव करणे हे या समाजाचे उद्देश होते.

१९ व्या शतकात भारतामध्ये सामाजिक व धार्मिक सुधारणेचे युग सुरु झाले. २० ऑगस्ट १८२८ रोजी ब्रम्हो समाजाची स्थापना राजा राममोहन रॉय यांनी केली. हिंदु धर्मातील मरगळ दूर करण्यासाठी १८२८ ला स्थापन झालेल्या ब्राम्हो समाज-वतीने सामाजिक आंदोलन उभे केले.

सुशिक्षित भारतीयांनी युरोपीयन देशाचे भ्रमण केल्यामुळे त्यांच्या दृष्टिकोनात परिवर्तन झाले. यासाठी राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, महात्मा ज्योतिबा फुले या समाजसुधारकांनी प्रभावी सामाजिक परिवर्तनाचे आंदोलने उभे केले.

## * प्रार्थना समाज :-

ब्राम्हो समाजापासुन प्रेरणा घेऊन महाराष्ट्रामध्ये एका समाज संघटनेची स्थापना झाली. ती प्रार्थना समाजाच्या नावाने प्रसिद्ध आहे. ३१ मार्च १८६७ रोजी प्रसिद्ध मुंबई येथे डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांना प्रार्थना समाजाची स्थापना करण्यासाठी न्यायमूर्ती रानडे, डॉ. भांडारकर, भाऊ महाजन, जस्टीज चंदावरकर, वामन मोडक असे संस्थापक अनुयायी लाभले. केशवचंद्राच्या कार्याचा प्रभाव प्रार्थना समाजावर पडलेला होता.

प्रार्थना समाजाचे सुधारक भक्तिमार्गी असुन हिंदु धर्माचे कट्टर अभिमानी होते. त्यांच्या मते आत्मिक प्रगतीसाठी प्रार्थना आवश्यक आहे. ब्राम्हो समाजाप्रमाणे समाजसुधारणा करण्याचा हेतु याही समाजाचा होता. जाती प्रथेचा विरोध. आंतरजातिय विवाह, विधवा विवाह, स्त्री शिक्षणावर भर देऊन अनाथ बालकांसाठी पंढरपुरला अनाथालये स्थापन केले. शिक्षणासाठी शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी डेक्कन एज्युकेशन

SEAL

सोसायटीची स्थापना न्या. रानडे यांनी केली. कामगारांसाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या. प्रार्थना समाजाची शिकवण लोकांना कळावी यासाठी "प्रेस्बार निवेशी कैफियत" हा निबंध लिहिला. समाजातील अनिष्ट चालीरिती नष्ट होण्यासाठी प्रार्थना समाजाच्या आवश्यकतेवर भर देऊन बालविवाहास विरोध केला तर विधवा विवाहाचा प्रचार करण्यासाठी "विडो रिमॅरिज असोसिएशन" ची स्थापना केली.

प्रार्थना समाजाला भक्ती प्रार्थना मान्य आहे. परंतु मुर्तिपुजा मान्य नव्हती कारण त्याचा वेळ देवतेच्या मुर्तीचे चिंतन होते. असा प्रकार यांना मान्य नव्हता. डॉ. भांडारकर यांच्या मते, ईश्वराच्या मुर्ती समोर भजन पुजन करतांना उपासक देवतेवर आरोपही करतो. म्हणुन प्रार्थनेचे महत्व विशद करतांना डॉ. भांडारकर म्हणतात, "कोणत्याही कारणास्तव देवाला शरण जाऊन प्रार्थना समाजाचे केली तर सामर्थ्य - बळ प्राप्त होते आणि अंतकरण शुध्द होते." याकरून प्रार्थना समाजाचे स्वरूप धार्मिक व आध्यात्मिक नसुन समाजसेवेचे व्रत होते. या समाजातील प्रत्येक सभासदाला विचाराचे स्वातंत्र्य

असल्यामुळे समाजाचे विघटन झाले नाही.
प्रार्थना समाजाने 'सुबोध पत्रिका' नावाचे
वर्तमान पत्र चालवुन संयमी व समन्वयवादी
सुधारणाचा पुरस्कार केल्यामुळे महाराष्ट्रात
पाश्चात्यांच्या अंधानुकरणाला प्रार्थना
समाजामुळे आळा बसला.

SEAL

# * ब्राम्हो समाज *

राजा राममोहन रॉय यांनी हिंदू, इस्लाम, बौध्द, जैन व ख्रिश्चन धर्माचा तुलनात्मक अभ्यास केला. कुरान, बायबल, वेद, उपनिषद यांचेही अध्ययन करून विश्वधर्माचा स्विकार केल्यानंतर इ. स. १८१४ मध्ये त्यांनी सरकारी नोकरीचा त्याग केला. आणि स्थाई स्वरुपात आपले जिवन समाज सेवेसाठी अर्पण करून आत्मीय सभेची स्थापना केली. याच सभेचे पुढे ब्राम्हो समाजात रुपांतर झाले. देवेंद्रनाथ ठाकूर, ईश्वरचंद्र विद्यासागर, मधुसूदन दत्त यांच्या मदतीने हिंदु धर्मातील अनिष्ट चालीरिती व कर्मकांडाचे सावट दूर करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला. त्यासाठी २० आगस्ट १८२८ रोजी ब्राम्हो सामाजाची स्थापना केली.

हिंदु धर्मातील मरगळ दूर करण्यासाठी १८२८ ला स्थापन झालेल्या ब्राम्हो समाजावतीने सामाजिक आंदोलन उभे केले. हिंदु धर्माला अंधश्रध्देच्या जोखडातून बाहेर काढणे, ख्रिस्ती धर्माच्या प्रचाराला त्यांना बळी पडुन न देणे, हिंदुधर्माच्या खऱ्या धर्मत्वाची ओळख करून देणे हाच उद्देश ब्राम्हो

समाजाची स्थापना करण्यामागे होता. त्यांच्या मते वेद प्रणित धर्म हाच खरा हिंदु धर्म आहे. ईश्वर एकच असुन मुर्तीपूजेला विरोध करून त्यांनी संवाद कौमुदी या पाक्षिकातुन सती प्रथा, जाती प्रथा, बालविवाह, कन्या-विक्री आणि बहुपत्नीत्वाची पद्धत यावर कडाडुन टिका सुरू केली. वेदांत सार नावाचा ग्रंथ लिहुन प्रजेला वेदाचे महत्व पटवुन दिले. म्हणुनच लॉर्ड बेंटिंकने राजा राममोहन रॉयच्या मदतीने इ.स. १८२९ मध्ये सती-बंदीचा कायदा केला.

इ.स. १८३१ मध्ये मोगल सम्राटने राजा राममोहन राय यांना 'राजा' हा किताब देऊन इंग्लंडला पाठविले. भारताविषयी माहिती देताना त्यांनी मुद्रण स्वातंत्र्याची मागणी केली. शेवटी इंग्लंडच्या वास्तव्यामध्ये २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टॉल येथे त्यांचे निधन झाले.

या पहिल्या भारतीय सुधारकाला मोगल सम्राटाप्रमाणे रविंद्रनाथ टागोरांनी "भारतीय लोकांचा उद्धार करण्यासाठी ज्या चळवळी झाल्या त्याचे आद्यजनक म्हणजे राजा राममोहन रॉय होते असे म्हटले."

SEAL

राजा राममोहन रॉयच्या निधनानंतर ब्राम्हो समाजाची धुरा देवेंद्रनाथांनी सांभाळली. "तत्वबोधिनी सभा" काढुन तिच्या मार्फत ब्राम्हो समाजाला संघटित करून ब्राम्हो समाजाचा प्रसार केला. त्यांनी ब्राम्हो समाजाच्या वतीने विधवा विवाहाचा प्रचार करून स्त्री शिक्षणावर भर दिला. केशव चंद्राच्या प्रयत्नाने ब्राम्हो समाजाच्या अनेक शाखा बंगालमध्ये स्थापन झाल्या. त्यामुळे ब्राम्होसमाजाचे विभाजन इ. स. १८६६ मध्ये झाले. देवेंद्रनाथाच्या ब्राम्हो समाजाला "आदि ब्राम्हो समाज" तर केशवचंद्राच्या "भारतीय ब्राम्होसमाज" असे नाव प्राप्त झाले. देवेंद्रनाथ केवळ धर्मसुधारणेवर आपले लक्ष केंद्रीत करित होते. तर केशवचंद्राने समाजसुधारणेचे व्रत घेतले.

स्त्रियांची परिस्थिती सुधारणे, मद्यपानविरोधी प्रचार, केला. आंतरजातिय विवाह, विधवा पुनर्विवाहाचे समर्थन, कामगारामध्ये शिक्षणाचा प्रचार, केला. जातीप्रथा नष्ट करण्यासाठी आंतर जातीय स्पर्धेला प्रोत्साहित केले. शिवाय विधवा महिलांचे विवाह घडवुन आणले. स्त्री शिक्षणासाठी नॉर्मल स्कूल आणि व्हिक्टोरिया इंस्टिट्यूट अशा शिक्षण संस्था स्थापन केल्या. स्त्रियांसाठी तंत्रशिक्षणाचीही व्यवस्था केली. मुलींच्या विवाहाची

कायद्याद्वारे वयोमर्यादा ठरविता यावी यासाठी इ. स. १८७२ मध्ये "द नेटिव्ह सिव्हिल मॅरेज ॲक्ट" द्वारे मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा १४ वर्ष ठरविण्यात आली कायदा पास करुन घेतला.

थोडक्यात भारतीय प्रबोधनाच्या काळात ब्राह्मो समाजाचे अग्रस्थान निर्विवाद आहे. केशवचंद्रांमुळे समाजाच्या कार्याला गती मिळाली हे मान्य करुन ब्राह्मो समाजाने हिंदु धर्माचा आत्मा जागृत करुन समाज परिवर्तनाबरोबर राष्ट्रवादी चळवळीतही योगदान दिले.

SEAL

## * सत्यशोधक समाज :-

महात्मा ज्योतीरावांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करतांना प्रथम अग्रक्रम राजकिय पारतंत्र्यापेक्षा सामाजिक पारतंत्र्याला दिला. समाजिक दास्याचे निराकारण झाल्यावरच नवा समाज निर्माण होऊ शकतो. त्यासाठी विषम धर्मव्यवस्था, जातीव्यवस्था, आर्थिक विषमता समजावून घेतल्यानंतर प्रत्येक पुरोगामी चळवळीच्या पाठीशी त्यांनी आपली ताकद उभी केली. मध्यम व दलगळातील लोकांचे संघटन करुन शोषितांचा आवाज बुलंद करण्यासाठी ज्योतीरावांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. म्हणूनच अनेक इतिहासकार सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरु ~~केली~~ करणारी सत्यशोधक ही पहिली संस्था होती हे मान्य करतात.

महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या वतीने सामाजिक परिवर्तने जे कार्य सुरु केले होते. ते कोणत्याही एका व्यक्तीसाठी, समाजासाठी,

प्रांतासाठी आणि धर्मासाठी नव्हते, या भूतलावरील समस्त स्त्री पुरुष हे एक आहेत त्यांनी बंधुभावाने एक जुटीने समाजवर्तन करावे त्यामुळे ज्योतीरावांचा लढा हा सांस्कृतिक वसाहतवाद विरुध्द होता. इंग्रजी राजवटीत बहुजनांचे आर्थिक शोषण कळसाला पोहचले होते. जातिव्यवस्था हे केवळ समाजरचना नसुन ती मानसिकता आहे. ती मानसिकता ज्या धार्मिकतावर आधारित होती. धार्मिकते निकालात काढणे आणि नवी सांस्कृतिक जाण निर्माण करुन नवी समाजरचना उभी करण्याच्या तत्वज्ञानातुन सत्यशोधक समाजाची स्थापना म्हणजे एक सचिन्ह होते.

SEAL

## * सत्यशोधक समाजाचे तत्वज्ञान -:

माहात्मा ज्योतिराव फुले यांनी 'गुलामगिरी' नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात धार्मिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकिय क्षेत्रात दलित, शोषित, गरिब, स्त्रिया यांचे गुलामगिरिचे वास्तव उघड केले.

१> ईश्वर हा निर्गुण निराकार आहे. सुर्यमंडळाचा व ग्रहोपग्रासहित सर्व प्राणिमात्राच्या निर्माता (ईश्वर) एक असला पाहिजे.

२> सृष्टीचा कर्ता एक एक आहे. त्यामुळे कोणत्या धर्माला विशिष्ट नावाने संबोधिला जाऊ नये.

३> प्रार्थनावर विश्वास मात्र मुर्तिपुजेला विरोध केला पाहिजे.

४> ईश्वर आणि भक्त यांच्या मध्यस्थासाठी पुरोहिताची आवश्यकता नाही. आपल्या ईश्वराची उपासना स्वतःच करावी.

५) कोणताही धर्म ग्रंथ हा ईश्वरनिर्मित नाही. सृष्टी हाच ईश्वर निर्मित ग्रंथ मानता येतो.

६) सत्य वर्तनामुळे मानव प्राणी सुखी होऊ शकतो. सत्यवचनामध्ये त्यांनी ३३ नियम काढले आहे.

७) ईश्वराचे स्वरूप अनंत आहे. त्याला खुश करण्यासाठी नैवेद्य, आराधना नवस, जपअनुष्ठान, नामघोष, इ. आवश्यकता नाही. स्वर्ग व नरक ह्या भ्रामक कल्पना आहे.

८) सावकार आणि जमिनदार यांच्या मगरमिठीतुन शेतकऱ्यांची सुटका केली पाहीजे.

९) सर्वांना शिक्षण मिळावे. त्यासाठी प्रयत्न करावे.

१०) अज्ञानी व निरक्षर प्रजेला त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे.

SEAL

## * सत्यशोधक समाजाचे कार्य :

ज्योतिराव फुले हे कृतिनिष्ठ समाजसेवक असल्यामुळे प्रत्येक समाज-सुधारणेच्या काळात त्यांनी कृतीचा दाखला दिला होता. दिनबंधु नावाचे वर्तमानपत्र काढून सत्यशोधक समाजाच्या कार्याचा प्रसार केला.

बहुजनसमाजाला जागृत करण्याचे ध्येय बाळगून त्यांनी खालीलप्रमाणे सामाजिक कार्य केले :

१) समाजामध्ये एकतेची भावना निर्माण केली, सर्व मानव प्राणी एकाच ईश्वराची लेकरे आहेत. परस्परात बंधुभावाचे आचरण करावे. निसर्गाने दिलेल्या वस्तूंचा सर्वांसाठी मुक्त वापर व्हावा. पंचेंद्रिये सारखीच तर व्यवहार सुद्धा समतेचा करावा अशी शिकवण दिली.

२) स्त्री व पुरुष यांच्या समानतेचा पुरस्कार केला. स्त्री शिक्षण होणार जुलूम, परंपरागत रूढी, स्त्री दास्यता अशा अनेक क्षेत्रात स्त्री मुक्तीसाठी ठोस कार्याला प्रारंभ केला.

३) धार्मिक वैवाहिक कार्यक्रमातुन पुरोहिताला बाजुला ठेऊन मंगलकार्य तेही मराठी भाषेतुन करण्याचा प्रारंभ केला.

४) सार्वजनिक सत्यधर्माचा स्विकार करून समाजामध्ये सत्यवर्तन कसे असावे यासाठी ३३ नियम दिले. त्या नियमाच्या माध्यमातुन सत्यधर्म हा मानवधर्म आहे असा प्रचार केला.

५) सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथातुन त्यांनी समाजाला चोरी करू नये, खोटे बोलु नये, मुर्तिपुजा करू नये, प्राणिमात्रास त्रास देऊ नये, वृध्दांचे पालनपोषण करणे, शिक्षकांनी दुजाभाव दाखवू नये, न्यायाधिशाने पक्षपात करू नये, मादक पदार्थांचे सेवन करू नये यासारखी शिकवण दिली.

६) सामाजिक गुलामगिरी व अन्यायविरुध्द सामाजिक परिवर्तनाची मागणी केली.

७) शेतकऱ्याप्रमाणे त्यांना कामगार व मजुराविषयी कळकळ होती. त्यांच्या समस्यांचे निराकरण इंग्रज सरकारने करावे अशी मागणी केली.

SEAL

समाजप्रबोधनासाठी त्यांनी जे ग्रंथ साहित्य लिहिले त्यामध्ये 'ब्राह्मणांचे कसब', गुलामगिरी, शेतकऱ्यांचा असूड, खतफोडीचे बंड, अस्पृश्यांची कैफित आणि सत्यशोधक समाज इ. ग्रंथमाध्यमातुन त्यांनी जनतेच्या दुःखाला वाचा फोडली समाजमधे दुःख कमी करण्यासाठी त्यावर उपाय म्हणुन ज्योतिरावांनी लोकशिक्षणाचा आग्रह धरला होता.

१९ व्या शतकात महात्मा ज्योतीराव फुले सत्यशोधक समाजातुन केलेले प्रबोधन बहुजन समाजाच्या सर्वांगिण जागृतीसाठी अत्यंत उपकारक ठरले. सत्यशोधक समाजाचे सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांच्या कृती-कार्यक्रम, स्वर्गनरक संकल्पना उघड करणे, नैवेद्य, मंत्रजागराने ईश्वरप्राप्तीचा मार्ग अवलंबण्याचे शोषण उघडे करणे. समाजपरिवर्तन समाजसुधारकांच्या हातुन होण्यापेक्षा आत्मभान आलेल्या अन्यायग्रस्त घटकांकडुन अधिक प्रभावीप्रमाणे पाडले जाते. अशी खात्री होताच ज्योतिरावांनी स्त्री- शूद्रांना जाणीव व जागृतीचा मार्ग दाखविला.

# * मुल्यमापन *

१९ व्या शतकात भारतामध्ये सामाजिक व धार्मिक सुधारणेचे युग सुरु झाले. सुधारणावादी कामाचा प्रारंभ धार्मिक क्षेत्रातुन आला होता. धार्मिक सुधारणेचे अंतिम उद्दिष्ट सामाजिक उत्थानमध्ये होते. १९ व्या शतकात भारतीय समाज जुन्या विचारांनी, बुरसटलेल्या विचारांनी, अंधश्रध्दांनी भारलेला होता. मात्र १९ व्या शतकात पाश्चात्य संस्कृतीशी संबंध आल्याने भारतीयात आमुलाग्र क्रांती घडून आली. त्याचा नव्या उत्साहाने कर्मकांड, अज्ञान, जातीयता, चालीरिती, विवाह संस्था यातुन भारतीय समाजाची बाहेर पडण्याची प्रक्रिया सुरु झाली. पाश्चात्य इंग्रजी भाषेने भारतीय समाजात मुक्तीचा मार्ग मोकळा केला. सुशिक्षित भारतीयांनी युरोपियन देशाचे भ्रमण केल्यामुळे त्यांच्या दृष्टिकोनात परिवर्तन झाले.

ज्योतिरावांच्या विचारांची पुढील काळात अंमलबजावणी झाल्यामुळे ब्राह्मण विरोधक भुमिका स्विकारुन ब्राम्हणेतर

राजकारण सुरू झाले. त्यामुळे स्त्री गुलामगिरित सवर्ण अस्पृश्य दुरावा कमी होण्याऐवजी वाढला. जातीभेद वाढला व अस्पृश्यतेचा प्रश्न जटील होत गेला. शेतकऱ्यांची दुरावस्था वाढली. अंधश्रद्धा व अज्ञानी मानसिकतेत मुलगामी परिवर्तन घडून आले नाही. हे जरी सत्य होते, तरी तळागाळातील अज्ञान व मागासलेल्या लोकांमध्ये समाजजागृतीचे कार्य सर्वप्रथम ज्योतिरावांनी केले.

तोपर्यंत फक्त ज्योतीराव पोहोचले होते शोषित समाजातील घटकांमध्ये नेतृत्वाची फळी उभारून संघर्ष करण्याच्या, समाजपरिवर्तनाच्या मार्ग दाखविला. त्यांच्या सत्यशोधक समाजानेच भारतीय समाजाला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटिल यांचे सारखे विचारवंत व समाजसुधारक मिळाल्यामुळे त्यांच्या समतेचे कार्य आढळते. ज्योतीरावांच्या दलितोद्धाराच्या कार्याचा प्रभावामुळे म. गांधीनी सुद्धा अस्पृश्यता निर्मूलनाच्या चळवळीत मोलाचे योगदान दिले.

SEAL
Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sushk Nagar, Nagpur-15